## <u>नियमित दरखास्त क्र.१४/ २०२२ निशाणी क्र.१२ वरील आदेश</u>

धनको यांनी प्रस्तुत दरखास्त दावा मिळकतीची मोजणी उपअधिक्षक, भुमिअभिलेख, नेवासा यांच्या मार्फत होउुन मिळण्याकरिता दाखल केले आहे. निशाणी क्र. ५ वरील आदेशान्वये उपअधिक्षक, भुमीअभिलेख, नेवासा यांची दावा मिळकतीची मोजणी करण्याकरिता न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यानुसार उपअधिक्षक, भुमिअभिलेख यांनी निशाणी क्र. १४ वरील पत्रासोबत निशाणी क्र. १५ वर मोजणी नकाशा दाखल केला. त्यानंतर धनको यांनी प्रस्तुत अर्जादवारे निशााणी क्र. १५ वरील नकाशा प्रमाणे हददीखुणा कायम करण्यात याव्यात अशी मागणी केलेली आहे. प्रस्तुत अर्जास ऋणको यांनी निशाणी क्र. १३ वर आपले म्हणणे सादर केले व निशाणी क्र. १५ वरील नकाशा मान्य असून त्याप्रमाणे हददीखुणा कायम करण्यात याव्यात अशी विनंती केली. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### <u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी १२ मंजूर करण्यात येत आहे.

२. उपअधिक्षक, भुमीअभिलेख, नेवासा यांनी दावा मिळकत मौजे वडाळा बहिरोबा, नेवासा येथील गट नं. <u>२४/१</u> व २४/२/फ याच्या हददीच्या खुणा निश्चीत करून तसा अहवाल सादर करावा.

३. धनको यांनी न्यायालयीन आयुक्त यांचे शुल्क परस्पर संबंधीत कार्यालयात जमा करावे. तसेच न्यायालयीन आयुक्त यांना आवश्यक कागदपत्र पुरवावेत.

स्वाक्षरीत/-

दि. ०४.०९.२०२४

**(श्रीमती.एस.वाय.सुळ)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
नेवासा